महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय
कार्यालय महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी.
कारेगांव नाका, सुपर मार्केटजवळ, परभणी.

☎No. (02452) (223447)
E-Mail : didic.parbhani@maharashtra.gov.in

जा.क्र.जिउकेंप/O.D.O.P./इतिवृत/२०२२/ दिनांक ०९/११/२०२२

**एक जिल्हा एक उत्पादन व EXPORT PROMOTION बैठकिचे इतीवृत्त.**

एक जिल्हा एक उत्पादन आणि एक्सपोर्ट साठीची बैठक मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.९.११.२०२२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांचे कक्षात दुपारी १.०० संपन्न झाली सदर बैठकिस खालील स्वाक्षरी करणारे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पद | कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्रीमती आंचल गोयल (भाप्रसे) | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष | जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी |
| २ | श्री.सुनिल हटटेकर | अग्रणी बँक अधिकारी | S.B.I. Parbhani |
| ३ | श्री.बी.एस.कच्छवे | नोडल अधिकारी स्मार्ट पोजेक्ट | जिल्हाअधिक्षक,कृषि अधिकारी कार्यालय,परभणी |
| ४ | डॉ.म.आय्युब | अध्यक्ष | रिलायबल ॲग्रो फुड,पुर्णा |
| ५ | श्री.ए.एस.बोडखे | प्रा.अधिकारी,प्रतिनिधी | विभागिय कार्यालय,एमआयडीसी,नांदेड |
| ६ | श्री.धनंजय देशमुख | जिल्हा वस्तु व सेवाकर अधिकारी | जिल्हा वस्तु व सेवाकर कार्यालय, परभणी |
| ७ | श्री.ओमप्रकाश डागा | अध्यक्ष | जिनिंग प्रेसिंग ओद्योगिक संघटना, परभणी |
| ८ | श्री.सुरेश पवार | महाव्यवस्थापक प्र. | जिल्हा उद्योग केंद्र,परभणी |
| ९ | श्री.एस.आर.पत्की | व्यवस्थापक,प्र. | जिल्हा उद्योग केंद्र,परभणी |

बैठकिच्या प्रारंभी जिल्हा उद्योग केंद्र,परभणी कार्यालयाचे व्यवस्थापक,श्री.आर.एस.पत्की यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे परिचय करुन स्वागत केल व आयुक्त उद्योग व निर्यात यांचेकडुन आलेल्या पत्राचे वाचन केले व अध्यक्षाचे परवानगीने सभेस सुरवात केली.

**1.एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत सामाईक सुविधा केंद्राची स्थापना करणे :-** उद्योग सहसंचालक निर्यात यांचे पत्र क्रं.C-10480 दिनांक 15.09.2022 नुसार परभणी जिल्हयाकरीता हरभरा (Gram) व गुळ व गुळाची उत्पादने (Jaggery Product ) या दोन उत्पादनाकरीता O.D.O.P. (One District One Product ) करिता निवड झालेली आहे.तसेच सदर जिल्हयामध्ये कापुस मोठया प्रमाणावर उत्पादन होत असल्यामुळे ता.सेलू येथे नियोजित C.F.C. च्या धर्तीवर उपरोक्त उत्पादनासाठी सामाईक सुविधा केंद्र, (C.F.C.) उभारणीबाबत चर्चा करण्यात आली. व एक महिन्यापर्यंत गुळ उत्पादक शेतकरी व दाळ उत्पादक उद्योजक यांची नावे निश्चित करुन बैठक आयोजित करावी.या कामी तज्ञ सल्लागार यांची उत्पादन (Product) निहाय शासन स्तरावर निवड करणेसाठी पत्र व्यवहार करणे बाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले.

Scanned with OKEN Scanner

**2.एक जिल्हा एक उत्पादनासाठी अधिकृत विक्रेते व निर्यातदार यांची यादी तयार करणे :-** जिल्हातील गुळ उत्पादक/उस उत्पादक शेतकरी/शेतकरी उत्पादन कंपनी/साखर उद्योजक/हरभरा होलसेल विक्रेते/दाळ मिल उद्योजक यांची यादी संबंधित विभागाकडुन घेवुन एकत्रित करावी.या बाबत कृषि विभाग,आत्मा,स्मार्ट योजने अंतर्गत लाभार्थिचा समावेश करावा.श्री.कच्छवे सर प्रकल्प संचालक,स्मार्ट योजना,कृषि यांनी 19 प्रकल्पांना मंजुर दयावयाची आहे.असे सांगितले वरील सर्व उद्योजकांना कृषि योजनांचा लाभ दयावा अशी सूचना मा.अध्यक्षांनी केली.

**3.एक जिल्हा एक उत्पादन करीता वस्तू निश्चित करणे :-** उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार हरभरा व गुळ उत्पादने (Jaggary Products) यांची निवड केलेली आहे.सदर बैठकित उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी यांनी सदर जिल्हयामध्ये सोयाबीन मोठया प्रमाणात उत्पादन होत असल्यामुळे सोयाबिन धान्याची एक जिल्हा एक उत्पादन (O.D.O.P.) निवड करावी व परभणी जिल्हयामध्ये सोयाबीनवर आधारित मोठा प्रकल्प जिल्हयांमध्ये उभा करावा असे सांगितले.

**4.सनियंत्रण आराखडा तयार करणे :-** परभणी Export Action Plan बाबत चर्चा करण्यात आली व निर्यात आराखडा मंजुर करण्यात आला.तसेच यात वेळोवेळी प्राप्त सूचनांचा समावेश करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सुचविले.

**5.Key O.D.O.P.Branding,Marketing & Publicity Activities राबविणे :-** जिल्हयातील O.D.O.P.Product करिता Branding साठी विशेष प्रयत्न करावेत शासन स्तरावर देण्यात येणा-या भेटी (Gift) मध्ये O.D.O.P.Product Gift Boxes चा समावेश करावा.दिल्ली हॉट,सुरजकुंड,हुन्नर हॉट,लखनऊ येथे होणा-या प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदवावा.जिल्हा उद्योग केंद्राच्या व शासनाच्या विविध विभागाच्या योजना मधुन O.D.O.P.Product करिता जास्तीत जास्त कर्ज प्रकरणे बँकाना शिफारस करण्यात यावीत.तसेच P.M.E.G.P. ,C.M.E.G.P. ,C.F.C., SMART, MUDRA ,NULM, M.S.R.L.M. ,P.M.F.M.E. यादी योजनांचा लाभ घ्यावा.

6.परभणी M.I.D.C. येथे पोलीस स्टेशन होणे बाबत. पोलीस अधिक्षक व एमआयडीसीचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन तसा अहवाल मुख्यालयास सादर करण्यात आला आहे.असे सांगितले.

7. मे.रिलायबल अँग्रो फुड,पुर्णा निर्यातदार यांनी पशु वाहतूक व आठवडी बाजार बदं असल्यामुळे अडचणी येत आहेत.असे सांगितले त्यावर अध्यक्षांनी आपले म्हणणे लेखी कळवावे असे सूचित केले.

8.निर्यातदारांनी पुरस्कार (Award) बाबत नॉमिनेशन फॉर्म भरुन देण्यात यावे असे सांगितले.

शेवटी महाव्यवस्थापक प्र.,जिल्हा उद्योग केंद्र,परभणी यांनी उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगी सभा संपन्न झाल्याचे सांगितले.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती,परभणी

मा.जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,जिल्हा निर्यात प्रचालन समिती,परभणी

Scanned with OKEN Scanner